# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)

(महाराष्ट्र शासन अधिसूचना कमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

### (महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५(महा.) फोन:०७१३२.२१६५५४,२२३१०४,२१६५१४फॅक्स रू ०७१३२,२२३३२२

**Email : arcollegesectiongug48@gmail.com web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org**

(डॉ. एस. एम. रोकडे)

संचालक (प्रभारी)

क्रमांक / महा.वि / गो.वि./ ९८६ / २०१६

दिनांक : ६ / ०९ / २०१६

प्रति,

मा. प्राचार्य / अध्यक्ष / सचिव,

संलग्नित सर्व महाविद्यालये

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:— आपदग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या मोफत महाविद्यालयीन शिक्षणाबाबत

संदर्भ:— १) मा. उपसचिव, उ.व तंत्र शिक्षण विभाग, मुबंई यांचे पत्र क्र. संकीर्ण—२०१६/प्र. क्र.४३१/विशि—३ दि. ०६/८/२०१६

२) जनता शिक्षण संस्था, वाई यांचे पत्र क्र. दि. २७ जुलै, २०१६

महोदय,

उपरोक्त संदर्भांकिंत विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्रातील दुष्काळ, पाणीटंचाई, नापिकी व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यामुळे शेतकरी कुटुंबे उध्वस्त होवू नयेत, महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील सर्व जातीधर्माच्या एकुण २५० अशा निराधार व गरीब विद्यार्थ्यांना तसेच आपदग्रस्त कुटुंबातील मुलांचे शिक्षण पुढे चालु राहावे म्हणुन महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील सर्व जातीधर्माच्या एकूण २५० अशा निराधार व गरिब विद्यार्थ्यांना (फक्त मुले) विनाशुल्क शिक्षण देण्याच्या व या विद्यार्थ्यांसाठी चहापान, नाष्ता, भोजन, पुस्तके, गणवेश, वैद्यकीय तपासणी, अंथरूण—पांघरूण, स्नानगृह इ. सुविधांची सुसज्ज वसतीगृहामध्ये मोफत व्यवस्था करण्याबाबत जनता शिक्षण संस्था, वाई या संस्थेने निर्णय घेतला असून त्यानुसार अशा गरजु विद्यार्थ्यांची माहिती माहिती सदरहु संस्थेला पाठविण्याची विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही करून सदरहु माहिती संस्थेला तात्काळ देण्यात यावी. व त्याची एक प्रत विद्यापीठात सादर करावी.

संलग्नित:—संदर्भीय पत्र

(डॉ. एस. एम. रोकडे)
संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतीलीपी माहितीकरिता अग्रेषित—**

१. श्री. प्रतापराव बाबुराव भोसले, अध्यक्ष व विश्वस्त,जनता शिक्षण संस्था, वाई जि. सातारा

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास कक्ष
आवक क्र. 3359 दिनांक 23/08/16
आवक क्र. 1788 दिनांक 25/08/16

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ..........
जावक क्र. 4346 दि. 23/8/16

महाराष्ट्र शासन

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
आवक क्र. 894 दि. 22/8/16
आवक क्र. 876 दि. 22/8/16

क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.४३१/१६/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. ६ ऑगस्ट, २०१६

प्रति,

संचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय:- आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या मोफत महाविद्यालयीन शिक्षणाबाबत.

सोबत श्री. प्रतापराव बाबुराव भोसले, अध्यक्ष व विश्वस्त जनता शिक्षण संस्था, वाई (जि.सातारा) यांचे पत्र दि.२७ जुलै,२०१६ पहावे. (प्रत सोबत जोडली आहे).

महाराष्ट्रातील दुष्काळ, पाणीटंचाई, नापिकी व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यामुळे शेतकरी कुटुंबे उध्वस्त होवू नयेत, तसेच आपद्ग्रस्त कुटुंबातील मुलांचे शिक्षण पुढे चालू रहावे म्हणून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील सर्व जातीधर्माच्या एकूण २५० अशा निराधार व गरीब विद्यार्थ्यांना (फक्त मुले) वाईतील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयामध्ये विनाशुल्क शिक्षण देण्याचा व या विद्यार्थ्यांसाठी चहापान, नाष्टा, भोजन, पुस्तके, गणवेश, वैद्यकिय तपासणी, अंथरूण-पांघरूण, स्नानगृह इ. सुविधांची सुसज्ज वसतीगृहामध्ये मोफत व्यवस्था करण्याबाबत सदरहू संस्थेने निर्णय घेतला असून त्यानुसार अशा गरजू विद्यार्थ्यांची माहिती संस्थेला पाठविण्याबाबतची विनंती केलेली आहे. त्यानुसार अशा गरजू विद्यार्थ्यांची माहिती सदरहू संस्थेला दि. १५ऑगस्ट, २०१६ पूर्वी देण्याबाबतची विनंती अध्यक्ष व विश्वस्त जनता शिक्षण संस्था, वाई (जि.सातारा) यांनी केली आहे. तरी सदरहू माहिती संस्थेला तात्काळ देण्याची कार्यवाही आपल्या स्तरावरून करण्यात यावी.

डॉ. मोहुर्ले सहायक
23/8/16

Registrar
Circulate

(सिध्दार्थ खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- सर्व कुलगुरू/ कुलसचिव, अकृषी विद्यापीठे.

26/8/16

Follow up my Review - on 1-8-16 -

जावक क्रमांक :

दिनांक : 27 JUL 2016

35 - 7 - 16
मुख्य सचिवांचे कार्यालय
दिनांक 30 JUL 2016
1759507

प्रतापराव बाबुराव भोसले
अध्यक्ष व विश्वस्त
जनता शिक्षण संस्था, वाई (जि. सातारा)
फोन - ०२१६७- २८५९९९
मो. ९४२२६००४२५
९८९०६७४६५५

29 JUL 2016

प्रति,

मा. श्री. स्वाधीन एस. क्षत्रीयसो.
मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन
६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय
मुंबई — ४०००३२

विषय :— आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या मोफत महाविद्यालयीन शिक्षणाबाबत.

महोदय,

महाराष्ट्रातील दुष्काळ, पाणीटंचाई, नापिकी व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यामुळे शेतकरी कुटुंबे उध्वस्त होवू नयेत, तसेच आपद्ग्रस्त कुटुंबातील मुलांचे शिक्षण पुढे चालू रहावे म्हणून महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील सर्व जातीधर्माच्या एकूण २५० अशा निराधार व गरीब विद्यार्थ्यांना (फक्त मुले) वाईतील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयामध्ये विनाशुल्क शिक्षण देण्याचा व या विद्यार्थ्यांसाठी चहापान, नाष्टा, भोजन, पुस्तके, गणवेश, वैद्यकीय तपासणी, अंथरुण—पांवरुण, स्नानगृह इ. सुविधांची सुसज्ज वसतीगृहामध्ये मोफत व्यवस्था करण्याचा संस्थेचा निर्णय आम्ही यापूर्वी दिनांक ०४ एप्रिल २०१६ रोजी सादर केलेल्या पत्राद्वारे आपणांस कळविलेला आहे. तसेच अशा गरजू विद्यार्थ्यांची माहिती त्यांच्या आमच्या महाविद्यालयातील प्रवेशासाठी वर्तणूकीच्या दाखल्यासह शासनाकडून मिळावी अशी आम्ही आपणांस विनंती केली होती. महाराष्ट्रातील जिल्हाधिकारी व आयुक्त यांनी अशा स्वरुपाची माहिती आमच्या संस्थेस पाठविण्याच्या आपल्या कार्यालयाच्या आदेशाची प्रत आम्हाला मिळालेली आहे. महाराष्ट्रातील काही जिल्हाधिकाऱ्यांनी तहसिलदार व प्रांत यांना अशी माहिती पाठविण्याचे जे आदेश दिलेले आहेत त्यांचीही प्रत आम्हाला मिळालेली आहे, परंतु आजअखेर आमच्या महाविद्यालयातील प्रवेशासाठी महाराष्ट्रातील एकाही जिल्हयातील आपद्ग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांची माहिती मिळालेली नाही. तसेच कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने आजअखेर आमच्या प्रकल्पास प्रत्यक्ष भेट देवून आमच्या उपक्रमाची दखल घेतलेली नाही. परंतु आता फार थोडा वेळ उरल्यामुळे दिनांक १५ ऑगस्ट २०१६ पूर्वी आपद्गस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांची माहिती संस्थेस प्राप्त होण्याची व्यवस्था करावी म्हणजे सदर विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षात विनाशुल्क प्रवेश देवून त्यांची मोफत निवास व्यवस्था करणे आम्हाला सोईचे होईल.

DS18

D.S.(IC)
2/8/16

Imm

कळावे.

We spoke.
This is an excellent offer.
Let me know.
CS.
29.7.16

A.S./H&T.E.

ACS/R&R

Chief Secretary
Government of Maharashtra

प्रतापराव भोसले
अध्यक्ष
जनता शिक्षण संस्था, वाई

Pl. discuss urgently
1/8